जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत 16 MAY 2016



कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठात बुधवारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते अमोघ थोरात यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शेजारी संजय कुबल, जगन कराडे, डॉ. व्ही. एन. शिंदे, आलोक जत्राटकर, जी. एस. राठोड, आदी उपस्थित होते.

# अमोघ थोरात यांचा कुलगुरुंच्या हस्ते सत्कार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सेवापूर्व मार्गदर्शन केंद्राचे विद्यार्थी व सांगली येथील अमोघ थोरात यांनी लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) परीक्षेत ९६६ व्या क्रमांकासह यश मिळविले आहे. याबद्दल कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते सत्कार त्यांचा करण्यात आला.

डॉ. शिंदे म्हणाले, सर्वसाधारण परिस्थितीतून मोठे यश संपादन करणाऱ्या अमोघ याचे यश हे विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. थोरात म्हणाले, माझ्या यशामध्ये विद्यापीठाच्या सेवापूर्व मार्गदर्शन केंद्राच्या मार्गदर्शनाचा महत्त्वाचा वाटा आहे. सन २०१० पासून आतापर्यंत अगदी एक ते सहा गुणांच्या फरकाने माझे 'युपीएससी'मधील गुणांकन हुकले, पण संयम राखून सातत्यपूर्ण प्रयत्नांनी हे यश साध्य करता आल्याचा आनंद मोठा आहे. कार्यक्रमास प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, संजय कुबल, जी. एस. राठोड, डॉ. जगन कराडे, आदी उपस्थित होते. (प्रतिनिधी)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत 16 MAY 2016

# विद्यापीठाची शासनाच्या सर्वेक्षणात शंभर टक्के नोंदणी

कोल्हापूर : केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या ऑल इंडिया सर्व्हे ऑन हायर एज्युकेशन (एआयएसएचई) या सर्वेक्षणात सलग चौथ्या वर्षी व राज्य शासनाच्या मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टीम (एमआयएस) या प्रणालीअंतर्गत सलग तिसऱ्या वर्षी शंभर टक्के माहिती अपलोड करण्याची कामगिरी शिवाजी विद्यापीठाने बजावली आहे. याबद्दल केंद्रीय, राज्यस्तरीय शिक्षण विभागाकडून विशेष पत्राद्वारे विद्यापीठाच्या यंत्रणेचे अभिनंदन केले आहे.

शिक्षक, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी प्रवेश, शैक्षणिक उपक्रम, परीक्षा निकाल, शिक्षणासाठी वित्तसाहाय्य, पायाभूत सुविधांची उपलब्धता, आदी विविध निकषांवर विश्वासार्ह व अधिकृत माहिती उपलब्ध होत असल्याने या उपक्रमाचे मोठे महत्त्व आहे. यात विद्यापीठाच्या कामगिरीबद्दल केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे सचिव अशोक ठाकूर यांनी पत्र, तर राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांनी विशेष प्रशस्तिपत्र पाठवून विद्यापीठाचे अभिनंदन केले आहे. दरम्यान, याबाबत कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, एआयएसएचई आणि एमआयएस या प्रणाल्यांमुळे केंद्र व राज्य सरकारला देशातील विद्यापीठे व महाविद्यालये यांच्याशी निगडित शैक्षणिक माहिती तत्काळ ऑनलाईन उपलब्ध होते. त्यामुळे शैक्षणिक धोरणे निश्चित करण्यासाठी या माहितीचा चांगला उपयोग होतो. शिवाजी विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालये यांनी या सुविधेचे महत्त्व जाणून त्यासाठी सातत्याने आणि वेळेत माहिती भरून दिली आहे. यात विद्यापीठाचे प्रशासन व संबंधित यंत्रणेची कामगिरी महत्त्वपूर्ण ठरली आहे. (प्रतिनिधी)

# माहिती अपलोड करण्यात तिसऱ्या वर्षी अव्वल

## केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडून विद्यापीठ यंत्रणेचे विशेष पत्राद्वारे अभिनंदन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या 'ऑल इंडिया सर्व्हे ऑन हायर एज्युकेशन' (ए.आय.एस.एच.ई.) या सर्वेक्षणात सलग चौथ्या वर्षी आणि राज्य शासनाच्या मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टीम (एम.आय.एस.) या प्रणालीअंतर्गत सलग तिसऱ्या वर्षी १०० टक्के माहिती अपलोड करण्याची कामगिरी शिवाजी विद्यापीठाने केली आहे. याबद्दल केंद्रीय तसेच राज्यस्तरीय शिक्षण विभागाकडून विशेष पत्राद्वारे विद्यापीठ यंत्रणेचे अभिनंदन करण्यात आले आहे.

### शैक्षणिक धोरणासाठी उपयोग : कुलगुरू

या संदर्भात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, ''ए.आय.एस.एच.ई. आणि एम.आय.एस. या दोन्ही प्रणालींमुळे केंद्र व राज्य सरकारला देशातील विद्यापीठे व महाविद्यालये यांच्याशी निगडित शैक्षणिक माहिती तत्काळ ऑनलाइन उपलब्ध होत असल्याने शैक्षणिक धोरणे निश्चित करण्यासाठी या माहितीचा चांगला उपयोग होतो. विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालये यांनी या सुविधेचे महत्त्व जाणून त्यासाठी सातत्याने आणि वेळेत माहिती भरून दिली आहे. या कामगिरीबद्दल बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव संजय कुबल, नोडल अधिकारी अभिजित रेडेकर यांच्यासह महाविद्यालयांचे प्राचार्य व नोडल अधिकारी हे सर्वच अभिनंदनास पात्र आहेत.''



केंद्र सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे २०१०-११ पासून ए.आय.एस.एच.ई. सर्वेक्षण कार्यक्रम हाती घेण्यात आला. शिक्षक, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी प्रवेश, शैक्षणिक उपक्रम, परीक्षा निकाल, शिक्षणासाठी वित्तसाह्य, पायाभूत सुविधांची उपलब्धता विविध निकषांवर अत्यंत विश्वासार्ह व अधिकृत माहिती उपलब्ध होत असल्याने या उपक्रमाचे मोठे महत्त्व आहे. त्यामुळे केंद्रीय स्तरावर अतिशय महत्त्व देण्यात असलेल्या या सर्वेक्षणात शिवाजी विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालये यांनी सलग चौथ्या वर्षी शंभर टक्के नोंदणी पूर्ण केली आहे. याबद्दल केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे सचिव अशोक ठाकूर यांनी विशेष पत्र पाठवून विद्यापीठाचे अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्र शासनातर्फे राज्यस्तरीय माहिती संकलनासाठी मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टीम (एम.आय.एस.) ही ऑनलाइन यंत्रणा विकसित केली. २०१३-१४पासून ती कार्यान्वित करण्यात आली. ए.आय.सी.टी.ई. अभ्यासक्रम वगळता कला, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र अशा संलग्नित १९६ महाविद्यालयांना याअंतर्गत ऑनलाइन माहिती भरावी लागते. या सिस्टीममध्येही विद्यापीठाने सुरवातीपासूनच सलग तीन वर्षे शंभर टक्के माहिती नोंदवून विक्रमी कामगिरी केली आहे. याबद्दल राज्याचे शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) डॉ. धनराज माने यांनी विशेष प्रशस्तिपत्र पाठविले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Times of India 16 MAY 2016

# Job fair at varsity today

**Kolhapur:** The Shivaji University and the information technology association here have jointly organised a job fair at the university campus on Monday.

The university's placement officer P N Bhosale said, over 400 job opportunities for freshers as well as experienced ones will be up for grabs at the fair. "It's a free event and it will be held at the chemistry department from 9am to 6pm. Aspirants should bring four copies of their resume, along with five passport size photos. Bhosale said 25 IT companies will participate in the event."

A university official said the job in January had witnessed mismanagement and chaotic situation because of the high number of participants. More than 800 students had received job at that fair. Participating companies had then asked the university to impart basic soft skills to students, following which the university had organised a skill fair in March.

National and international companies will be a part of the Monday's fair. For more information students can contact Kailash Medhe at 8421152775, the official added. TNN

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ 16 MAY 2016

# 'जॉब फेअर-२०१६'चे आज विद्यापीठात आयोजन

## २५ कंपन्यांचा सहभाग; ४५० उमेदवारांची निवड शक्य



कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती प्लेसमेंट कक्ष व आयटी असोसिएशन ऑफ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या (ता. १६) 'जॉब फेअर-२०१६'चे आयोजन करण्यात आले आहे. सोमवारी सकाळी नऊ ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागात मेळावा होईल.

सर्व शाखांच्या पदवीधर विद्यार्थ्यांसाठी हा मेळावा आहे. तो विनाशुल्क असून इच्छुकांनी बायोडाटाच्या चार प्रती आणि पाच पासपोर्ट आकाराची छायाचित्रे सोबत आणावीत. या मेळाव्यात साधारण २५ आयटी क्षेत्रातील कंपन्या सहभागी होणार असून त्यांच्या माध्यमातून ४५० जागांसाठी उमेदवारांची निवड होणे अपेक्षित आहे. विद्यापीठाने विद्यार्थ्यांना पदवी हातात मिळताच,

पान २ वर »

# 'जॉब फेअर-२०१६'चे आज विद्यापीठात आयोजन

» पान १ वरून

त्वरित नोकरी मिळावी, यासाठी विद्यापीठातच रोजगार मेळावा घेण्यास सुरवात केली आहे. विद्यापीठातर्फे जानेवारीत झालेल्या रोजगार मेळाव्यास साडेसात हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. सुमारे पंचेचाळीस कंपन्यांनी येथे येऊन मुलाखत प्रक्रिया राबवली होती. या प्रक्रियेतून सुमारे आठशे विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळाल्या. या मेळाव्याच्या अनुषंगाने प्लेसमेंटचे समन्वयक प्रा. डॉ. पी. एन. भोसले म्हणाले, ''प्लेसमेंटतर्फे २०१० ते २०१५ दरम्यान झालेल्या मेळाव्यांतून सुमारे सात हजार विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळाल्या आहेत. या विद्यार्थ्यांचे अडीच लाख ते साडेतीन लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज आहे. यंदा झालेल्या मेळाव्यातून ११५० विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळाल्या आहेत. उद्या होत असलेल्या मेळाव्यासाठी प्रत्येक कंपनीचे दोन एचआर विद्यार्थ्यांची मुलाखत घेतील. विद्यापीठातील तीस कर्मचारी मेळाव्याचे कामकाज पाहणार आहेत.''

**शिवाजी विद्यापीठ : २९ अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेस ११५५५ विद्यार्थ्यांची नोंदणी; तर १० हजारजणांनी दिली परीक्षा**

# गणित, रसायनशास्त्रकडे ओढा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एम. एस्सी. केमिस्ट्री (रसायनशास्त्र), गणित आणि भौतिकशास्त्र या पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेशित होण्याकडे विद्यार्थ्यांचा यावर्षी अधिक कल आहे. यासाठी झालेल्या प्रवेश परीक्षांसाठी ८०० चा आकडा ओलांडला आहे. मात्र, एमजेसी, एमसीए आणि एम. लिब. अभ्यासक्रमाकडील विद्यार्थ्यांची संख्या घटली आहे.

विद्यापीठातील विविध २९ अभ्यासक्रमांसाठी गेल्या पाच दिवसांत प्रवेश परीक्षा झाली. यासाठी ११५५५ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी नोंदणी केली होती. त्यांपैकी १००८१ जणांनी परीक्षा दिली, तर १४६४ जणांनी दांडी मारली. पदवी, पदव्युत्तर विभागांतील २५ अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑफलाईन, तर चार अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आल्या. ऑफलाईनमधील एम. एस्सी. केमिस्ट्रीसाठी सर्वाधिक २७९९, तर गणित १००३, भौतिकशास्त्र ८१६, वनस्पतिशास्त्रासाठी ४३७ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी परीक्षा दिली. अन्य अभ्यासक्रमांच्या तुलनेत संबंधित अभ्यासक्रमांची परीक्षा दिलेल्या परीक्षार्थींची संख्या दुप्पट-तिप्पट आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश मिळविताना विद्यार्थ्यांचा कस लागणार आहे. एमजेसी (१८), एमसीए, एम. टेक. , एम. लिब. सायन्स अँड इन्फॉर्मेशन (प्रत्येकी १३) अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांनी पाठ फिरविली आहे. या अभ्यासक्रमांच्या परीक्षार्थींचा आकडा २० च्या आत आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमांसाठीच्या जागा भरणार नसल्याने यावर्षी संबंधित अभ्यासक्रमांसाठी पुनर्प्रवेश परीक्षा घ्यावी लागणार असल्याची दाट शक्यता आहे. अन्य अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा दिलेले विद्यार्थी : बीजेसी (१२२), एम. ए. फॅकल्टी चेंज (३०७), एमबीए डिस्टन्स मोड (२७३), एम. ए. मास कम्युनिकेशन (२१), एमएसडब्ल्यू (९७), एमआरएस (२६), एमबीए (८४), एमसीए सायन्स (२१६), एमसीए कॉमर्स (७२), एम. एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स (१२१), एम. एस्सी. कॉम्प्युटर सायन्स (३१८), एम. एस्सी. स्टॅटिस्टिक्स (४०१), मायक्रोबायोलॉजी (५२१), जिओलॉजी (४४), एम. ए. अथवा एम. एस्सी जिऑग्राफी (३४४), बी. लिब. सायन्स अँड इन्फॉर्मेशन (११६), एम. एस्सी एजीपीएम (१९४). एम. एस्सी झूलॉजी (३६९), बायोटेक्नॉलॉजी (४१८), पर्यावरणशास्त्र (२७०) आणि फू[ड] सायन्स अँड टेक्नॉलॉजी (३२०).

## महाविद्यालयीन पातळीवर जागृती

रसायनशास्त्र, गणित, भौतिकशास्त्र अभ्यासक्रमांकडील विद्यार्थी वाढण्याचे कारण म्हणजे संबंधित अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर नोकरी मिळते ही विद्यार्थ्यांची झालेली समजूत आहे, असे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सांगितले. ते म्हणाले, एमजेसी, एमसीए, एम. लिब., आदी स्वरुपांतील अभ्यासक्रम हे महाविद्यालयातील पदवी पातळीवर नाहीत. त्यामुळे त्यांची माहिती विद्यार्थ्यांना मिळत नसल्याने या अभ्यासक्रमाकडे विद्यार्थ्यांचा कल कमी असल्याचे दिसते. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातून उपलब्ध होणाऱ्या रोजगाराच्या संधींची माहिती मिळाल्यास निश्चितपणे संबंधित अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा ओघ वाढेल. याबाबत करिअर मार्गदर्शन कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयीन पातळीवर विद्यापीठातर्फे जागृती करण्याचा विचार आहे.

## यंदा ७२ विद्यार्थी वाढले

सन २०१५ मध्ये विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांसाठी तीन टप्प्यांमध्ये प्रवेश परीक्षा घेण्यात आली. यात एकूण १०००९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. यावर्षी यात ७२ विद्यार्थ्यांची भर पडली आहे.



## मे अखेरपर्यंत निकाल

विद्यापीठाच्या २९ अभ्यासक्रमांसाठी घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षा शांततेत आणि वेळेत पार पडल्या. या परीक्षांच्या उत्तरपत्रिका तपासणीचे काम सुरु झाले आहे. मे महिन्याच्या अखेरपर्यंत निकाल लावण्यात येईल, असे परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी सांगितले.